# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ८८-२३ दिनांक :- १८/०३/२०२३

## वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणा-या आरोपीतास अटक करुन ०२ पिडीत महिलांची सुटका - अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांची कारवाई.

दिनांक १५/०३/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, नालासोपारा यांना गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की, वालीव पोलीस ठाणे हद्दीतील प्लॅटिनम हॉस्पिटल जवळ, रेंज नाका वसई पुर्व या ठिकाणी एक पुरुष वेश्यादलाल हा वेश्यागमनाकरीता महिलांना प्रवृत्त करतो.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक शाखेचे पो.नि. श्री. संतोष चौधरी यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन मिळालेल्या बातमीची शहानशिा केली व बोगस गि-हाईकास पंचासह रेंज नाका, प्लॅटिनम हॉस्पिटल जवळ पाठविले असता सदर ठिकाणी वेश्यादलाल किसन ऊर्फ टायगर ब्रिजेश गौंड, वय २७ वर्षे याने बोगस गि-हाईकास काही मुलींचे फोटो दाखवून त्याचा मोबदला स्विकारताच त्यास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे अधिकारी व अंमलदार यांनी ताब्यात घेतले व त्याच्याकडे अधिक विचारपूस करता त्याने वेश्यागमनाकरीता मुलींना कॅपिटल मॉल, नालासोपारा येथे ठेवले असल्याचे सांगितल्याने सदर ठिकाणी पंचासह जावून खात्री करुन दोन पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे.

सदरबाबत पो. हवा. श्री. राजेश पदमने यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाणेत गु. रजि. नं. ३१५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७० सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे आरोपीत किसन ऊर्फ टायगर ब्रिजेश गौंड याचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा, नालासोपारा युनिटचे पो.नि. श्री. संतोष चौधरी, पो.हवा. पवार, पद्मने, किणी, शेटये, शिंदे, म.पो.हवा. डोईफोडे, तिवले, चालक पो.हवा. पागी, सर्व नेम. अनै.मा.वा.प्र.कक्ष, नालासोपारा व रेस्क्यु फाउंडेशन पोईसर कांदीवलीचे सदस्य यांनी केली आहे.

**----0000----**